माजी आमदारांवर केले आमदारांनी गंभीर आरोप

आ. संजय गायकवाड-विजयराज शिंदे वाद पेटला

बुलढाणा, ब्युरो. भाजप आणि शिंदेंसेनेतील वाद बुलढाण्यात पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे. शिवसेना शिंदे गटाचे आ. संजय गायकवाड यांनी भाजप जिल्हाध्यक्ष आणि माजी आमदार विजयराज शिंदेंवर गंभीर आरोप केले आहेत. माजी आमदारांनी आश्रमशाळेतील विद्यार्थिनींचे आयुष्य बरबाद केले, असा गंभीर आरोप केला. तर आ. गायकवाड यांचे आरोप शिंदेंनी खोडून काढले. या आरोप प्रत्यारोपाच्या फैरीने राजकारण चांगलेच तापले आहे.

या प्रकरणावरून भाजपही आक्रमक झाला आहे. त्यांनी देऊळगाव राजा तहसीलदार वैशाली डोंगरजाळ व ठाणेदार ब्रम्हागिरी यांना निवेदन दिले. त्यात बुलढाणाचे आ. गायकवाड यांनी पत्रकारांशी संवाद साधताना माजी आमदार तथा भाजप जिल्हाध्यक्ष विजयराज शिंदे यांच्या बद्दल राजकीय आकसा पोटी घाणेरडे आरोप लावले. आश्रमशाळेतील मुलीबद्दल सर्रास आक्षेपार्य व लज्जास्पद विधान करून बदनामी केली. आ. गायकवाड यांनी यापूर्वीही मुख्यमंत्री फडणवीस आणि चिखलीच्या आ. श्वेता महाले यांच्या विषयी आक्षेपार्य विधान केले आहे. आ. गायकवाड हे हेतुपुरस्सर भाजप नेते आणि पक्षाची बदनामी करीत असल्याचा आरोप या तकरण्यात आला. बेताल वक्तव्य करणाऱ्या आ. गायकवाड यांच्यावर ॲट्रॉसिटी ॲक्टसह इतर गुन्हे दाखल करण्याची मागणी करण्यात आली. यावेळी महिला भाजप जिल्हाध्यक्ष सविता पाटील, उपनगराध्यक्ष वनिता भुतडा, ओबीसी मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुनील कायंदे, तालुका अध्यक्ष प्रभाकर नांगरे, डॉ. शंकर तलबे, भाजपा युवा नेते गणेश नागरे, नगरसेवक निशिकांत भावसार, प्रवीण धन्नावत, धर्मराज हनुमंते, संजय पाटील, सुरज हनुमंते, लोकेश डोणगावकर, संजय मुंडे, संचित धन्नावत, रामेश्वर जायभाये उपस्थित होते.

वंचितचा रस्त्यावर उतरण्याचा इशारा

आ. गायकवाडांच्या अरोपामुळे अनेक विद्यार्थिनी व पालकांना मानसिक तणावाचा सामना करावा लागत आहे. त्यांनी माफी न मागितल्यास वंचित जिल्हाभर रस्त्यावर उतरून आंदोलन करेल, असा इशाराही वंचितचे जिल्हाध्यक्ष निलेश जाधव यांनी दिला आहे. तसेच त्यांच्यावर पॉक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करावा, अशी मागणी वंचितकडून करण्यात आली आहे.

शाळेचा टीसी वयाचा निर्णायक पुरावा नाही

हायकोर्टाचा निर्वाळा, पोक्सो आरोपीला जामीन

मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. शाळा सोडल्याचा दाखला (टीसी) हा वयाचा निर्णायक पुरावा मानता येणार नाही, असा महत्त्वपूर्ण निर्वाळा उच्च न्यायालयाने एका प्रकरणात दिला आणि त्याच आधारे पोक्सोच्या गुन्ह्यातील आरोपीला जामीन मंजूर केला. २५ वर्षीय तरुणाने पीडित मुलीवर बलात्कार केल्याचा आरोप आहे. तथापि, दोघांमध्ये प्रेमसंबंध असण्याची शक्यता नाकारता येत नसल्याचे न्यायालयाने नमूद केले. न्यायमूर्ती आर. एम. जोशी यांच्या एकलपीठाने हा निर्णय देत आरोपीला दिलासा दिला. आरोपी तरुण २५ वर्षांचा होता, तर मुलगी १५ वर्षांची होती. त्यांचे प्रेमसंबंध होते. आरोपीने बहिणीची ओळख करून देण्याच्या बहाण्याने पीडित मुलीला घरी नेले. तेथे तिला फ्लॅटमध्ये डांबून ठेवत बलात्कार केल्याचा आरोप आहे. पीडित मुलीने जबाब दिल्यानंतर आरोपीची वैद्यकीय तपासणी करण्यात आली होती. त्यानंतर १० ऑगस्ट २०२२ रोजी आरोपी जयेश पारधीला अटक करण्यात आली होती.

रील स्टार सोनाली हिंगेसह पोलिसांवर गुन्हा

महिला प्राचार्याला ब्लॅकमेल

पुणे, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. एका नामांकित शैक्षणिक संस्थेच्या महिला प्राचार्याला ब्लॅकमेल करून ७ लाख रुपये उकळल्याप्रकरणी पोलिसांवरच गुन्हा दाखल झाल्याने खळबळ उडाली आहे. बंडगार्डन पोलीस ठाण्यात उपनिरीक्षकासह तीन पोलीस कर्मचाऱ्यांविरोधात गुन्हा नोंद करण्यात आला असून अजित बडे, सोनाली हिंगे आणि सुदाम तायडे अशी आरोपींची नावे आहेत. विशेष म्हणजे 'दामिनी पथका'शी संबंधित असलेली महिला कर्मचारी सोनाली हिंगे ही सोशल मीडियावर 'रील स्टार' म्हणूनही प्रसिद्ध असल्याने प्रकरण अधिक चर्चेत आले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित प्राचार्य महिलेला 'पॉक्सो' कायद्यांतर्गत गंभीर गुन्हा दाखल करून अटक होऊ शकते, अशी भीती दाखवत प्रकरण मिटवण्यासाठी ७ लाख रुपयांची मागणी करण्यात आली. अटक आणि बदनामीच्या भीतीपोटी महिलेने ही रक्कम दिली. मात्र, नंतर संशय आल्याने त्यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रार केली.तक्रार मिळताच पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी तत्काळ चौकशीचे आदेश दिले. प्राथमिक चौकशीत पोलिसांचा सहभाग स्पष्ट झाल्यानंतर संबंधितांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

स्टॉक तपासणी, सिलिंडर मोजणी व अधिकाऱ्यांना सूचना

जिल्हाधिकाऱ्यांची गॅस एजंसीवर धाड

चंद्रपूर, ब्युरो. सध्याच्या आंतरराष्ट्रीय परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात इंधन व घरगुती सिलिंडरचा पुरवठा सुरळीत राहावा यासाठी जिल्हाधिकारी वसुमना पंत यांनी गुरुवारी ॲक्शन मोडमध्ये येत गॅस एजन्सी व सिलिंडर गोदामांची अकस्मिक तपासणी केली. या अचानक भेटीमुळे एजन्सी व्यवस्थापनात एकच खळबळ उडाली.

दीक्षाभूमी परिसरातील एका गॅस एजन्सीला भेट देत जिल्हाधिकारी पंत यांनी सर्वप्रथम स्टॉक रजिस्टरची बारकाईने पाहणी केली. रोज किती ग्राहक बुकिंग करतात, त्यानुसार किती सिलिंडर उपलब्ध करून दिले जातात, घरगुती व व्यावसायिक सिलिंडरचा साठा, वितरण व शिल्लक याची सविस्तर माहिती त्यांनी घेतली. रजिस्टरमधील नोंदी नियमित व अचूक ठेवण्याच्या सूचना त्यांनी कर्मचाऱ्यांना दिल्या. तसेच ग्राहकांची गैरसोय होणार नाही, याची काळजी घेण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

यानंतर जिल्हाधिकारी पंत यांनी भटाळी येथील गोदामाला भेट देऊन प्रत्यक्ष सिलिंडर साठ्याची पडताळणी केली. गोदामातील भरलेले व रिकामे सिलिंडर यांची प्रत्यक्ष मोजणी करून रजिस्टरमधील आकडेवारीशी ताळमेळ तपासण्यात आला. रेकॉर्ड व प्रत्यक्ष साठा यात कोणतीही तफावत आढळू नये, यासाठी त्यांनी अधिकाऱ्यांना दक्ष राहण्याच्या सूचना केल्या. यावेळी त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, जिल्ह्यात घरगुती व व्यावसायिक सिलिंडरचा कोणताही काळाबाजार होऊ देणार नाही. ग्राहकांना वेळेवर व नियमानुसार गॅस मिळावा, यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी नियमित तपासणी मोहिमा राबवाव्यात. गॅस एजन्सी व गोदामावर वेळोवेळी अचानक भेटी देऊन नियंत्रण ठेवण्याचे निर्देश त्यांनी दिले.

कर नाही, तर डर कशाला?

राऊतांचा सवाल; अजित मृत्यूप्रकरणी गुन्हा नोंदवा

मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातातील मृत्यूप्रकरणी गुन्हा दाखल करण्याच्या मागणीवरून राजकीय वातावरण तापले असून, शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी भाजपला थेट आव्हान दिले आहे. कर नाही त्याला डर कशाला? असा सवाल करत त्यांनी एफआयआर नोंदवण्याची मागणी पुन्हा लावून धरली.

आमदार रोहित पवार यांनी सुरुवातीपासूनच याप्रकरणी गुन्हा दाखल करून सखोल चौकशीची मागणी केली आहे. कर्नाटकमध्ये झीरो एफआयआर नोंदवला असला, तरी महाराष्ट्रात अद्याप गुन्हा दाखल नाही. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ आणि बारामतीत माघार घेतलेले उमेदवार आकाश मोरे यांनीही हीच भूमिका घेतली आहे. राऊत यांनी मुख्यमंत्री आणि सत्ताधाऱ्यांवर टीका करत म्हटले की, अपघातातील सत्य बाहेर काढण्याची भाषा केली जाते, पण त्यासाठी आवश्यक एफआयआरच नोंदवला जात नाही. संबंधित विमान कंपनीवर गुन्हा नोंदवण्यास सरकार टाळाटाळ करत असल्याचा आरोपही राऊत यांनी केला.

एमडी अंमलीपदार्थासह एक आरोपी अटकेत

सुकळी मार्गावर १५.२६० ग्रॅम एमडी जप्त

अमरावती, ब्युरो. शहरातील नागपुरी गेट पोnfस ठाण्याच्या हद्दीत अंमलीपदार्थ विरोधी पथकाने मोठी कारवाई करत एकाला एमडी. ड्रग्जसह अटक केली आहे. या कारवाईत अंमलीपदार्थ, दुचाकी आणि मोबाइल असा एकूण १ लाख ३२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

गुरुवारी नागपुरी गेट पोलिस ठाण्यातील डीबी पथक प्रमुख पोलिस हवालदार मलिक अहमद यांना गोपनीय माहिती मिळाली की, लालखडी रेल्वे फाटक परिसरातून सुकळी गावाकडे जाणाऱ्या मार्गावर एक इसम दुचाकीवरून अंमलीपदार्थ विक्रीसाठी येणार आहे. त्यांनी ही माहिती वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांना दिली आणि त्यानंतर पोलिसांनी शासकीय पंच, फॉरेन्सिक पथक आणि फोटोग्राफर यांच्या उपस्थितीत सापळा रचला. यावेळी पोलिसांनी संशयित इसम शेख नौशाद शेख सलीम (३२, रा. बिस्मिल्ला नगर) याला ताब्यात घेतले. या प्रकरणी पोउपनि जितेंद्र भार्गव यांच्या फिर्यादीवरून आरोपीविरुद्ध नागपुरी गेट पोलिस ठाण्यात कलम ८(सी), २१(ब) एन.डी.पी.एस. ॲक्टअन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई अमरावती शहर पोलिस आयुक्त राकेश ओला, उपायुक्त गणेश शिंदे आणि सहा. आयुक्त कैलास पुंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या कारवाईत पोलिस निरीक्षक उरलागोंडावर, साळुंखे, निशांत देशमुख तसेच डी.बी. पथकातील पोहेकॉ मलिक अहमद, दिनेश नांदे, दानिश शेख, राहुल रोडे आणि सागर पंडित यांनी सहभाग घेतला.

गळफास घेऊन तरुणाची आत्महत्या

रिसोड. वडिलांच्या नावे असलेले बँकेचे कर्ज फेडण्याची जबाबदारी असलेल्या शेतकरी पुत्राने झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना पाचंबा शिवारात बुधवारी मध्यरात्री घडली. मारोती डिंगाबर डाहाळके (३३, रा. एकलासपूर) असे मृताचे नाव आहे. सदर घटना गुरुवारी सकाळी शेतात गेल्यानंतर शेतकऱ्याच्या निदर्शनास आली.

मणिपूरमध्ये हिंसक आंदोलने

संचारबंदीतही हजारो लोक रस्त्यावर

इम्फाळ, वृत्तसंस्था. दोन निष्पाप मुलांचा बळी घेणाऱ्या बॉम्ब हल्ल्याच्या निषेधार्थ मणिपूरच्या खोऱ्यातील पाच जिल्ह्यांमध्ये हजारो लोकांनी संचारबंदी झुगारून निदर्शने केली. ऑल मणिपूर युनायटेड क्लब्स ऑर्गनायझेशनच्या नेतृत्वाखाली शेकडो लोकांनी इम्फाळ पश्चिम जिल्ह्यातील टिडिम लाइन येथे रॅली काढली. आंदोलकांनी या घटनेचा निषेध केला आणि गुन्हेगारांना अटक करण्याची मागणी केली. मात्र, सुरक्षा दलांनी क्वाकेथेलजवळ रॅलीला पुढे जाण्यापासून रोखले. नंतर संघटनेच्या प्रतिनिधींना मुख्यमंत्री एन. बिरेन सिंग यांच्या भेटीसाठी नेण्यात आले. ७ एप्रिल रोजी, बिष्णुपूर जिल्ह्यातील ट्रोंगलाओबी परिसरात संशयित दहशतवाद्यांनी एका घरावर बॉम्ब हल्ला केला, ज्यात ५ वर्षांचा मुलगा आणि त्याची ६ महिन्यांची बहीण ठार झाली. गुरुवारी, पश्चिम इम्फाळमधील समरौ येथे आंदोलकांनी मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानाकडे मोर्चा नेण्याचा प्रयत्न केला, परंतु पोलिसांनी त्यांना रोखले. बिष्णुपूरमधील मोइरांग लामखाई आणि निंगथौखोंग येथे टायर जाळून रस्ते अडवण्यात आले होते. पूर्व इम्फाळ, थौबल आणि काकचिंग जिल्ह्यांमध्येही अशीच आंदोलने दिसून आली.

दादांच्या सरकारलाच एफआयआर का नको?

ज्या सरकारमध्ये दादा होते, त्या सरकारनेच एफआयआर घ्यायला का नकार दिला? असा सवाल राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाच्या कार्याध्यक्ष खासदार सुप्रिया सुळे यांनी केला आहे. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान दुर्घटनेप्रकरणी सुप्रिया यांनी पुण्यात माध्यमांशी बोलताना एफआयआर नोंदवण्यास झालेल्या विलंबावर गंभीर प्रश्न उपस्थित केले. दुर्घटनेच्या चौकशीसाठी एफआयआर दाखल करण्यासाठी रोहित पवारांना कर्नाटकातील काँग्रेस सरकारकडे जावे लागल्याचे सुप्रियांनी नमूद केले. संसदेत हा मुद्दा मांडला, तरी राज्य विधानसभेत अपेक्षित चर्चा झाली नसल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली.

Short News

टीसीसाठी ३०० लाच, मुख्याध्यापिका जाळ्यात

संभाजीनगर, प्रवेश-निर्गम उतारा देण्यासाठी ३०० रुपयांची लाच घेताना शहरातील एका नामांकित शाळेच्या मुख्याध्यापिकेला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडले आहे. मारिया जोस एस्तिबरो (५२) असे आरोपी मुख्याध्यापिकेचे नाव आहे. छावणी परिसरातील शाळेत शिकलेल्या तक्रारदाराने प्रवेश-निर्गम उताऱ्यासाठी अर्ज केला होता. परंतु त्यासाठी ५०० रुपयांची मागणी मुख्याध्यापिका मारिया यांनी केली. तक्रारदाराने अर्ज व कागदपत्रे स्पीड पोस्टाने शाळेत पाठवली. त्यावरही मारिया यांनी उतारा दिला नाही. दरम्यान, अर्जदाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दिली होती. विभागाने सापळा रचून कारवाई करत तडजोडीअंती ३०० रुपये घेताना मुख्याध्यापिकेला पकडले.

धारदार शस्त्राने वार करून तरुणाची हत्या

गोंदिया. तिरोडा पोलिस ठाण्यांतर्गत कोडेलोहारा येथे जुन्या वादातून एका तरुणाने चौघांवर चाकूने हल्ला करून त्यांचा खून करण्याचा प्रयत्न केला. या घटनेत गंभीर जखमी झालेले अंकित टेंभेकर (२८, रा. कोडेलोहारा) याचा बुधवारी उपचारादरम्यान शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात मृत्यू झाला. हर्षा नंदेश्वर (३५,) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, ३ एप्रिल रोजी त्याच्या भावाच्या घरी कोडेलोहारा येथे त्याचा मुलगा क्रश नंदेश्वर व मामा अंकित टेंभेकर यांच्यात गावात वाद सुरू झाला होता.

२२चा बॉयफ्रेंड, ३५ची गर्लफ्रेंड रूममध्ये गेले अन्...तिचा मृतदेह

दिल्लीतील घटनेने खळबळ

दिल्ली, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. १३ वर्षांनी मोठी गर्लफ्रेंडसोबत गेल्या ७ वर्षांपासून सुरू असलेल्या रिलेशनशिपचा रक्तरंजित अंत झाल्याने दिल्लीच्या मंगोलपुरी भागात खळबळ उडाली. तो २२ वर्षांचा तर गर्लफ्रेंड ३५ वर्षांची होती. मंगळवारी दुपारपर्यंत दोघांमध्ये सर्वकाही सुरळीत सुरू होते. पण मंगळवारी त्यांच्यात काय बिनसले माहिती नाही. दुपारी ४.३० वाजता दोघेही पीजी रूममध्ये गेले, त्यांच्यात काही तरी बिनसले आणि त्याने तिचा गळा आवळून खून केला व मृतदेह बेडच्या बॉक्समध्ये लपवला. पीजी मालकाच्या सतर्कतेमुळे हत्येची ही घटना समोर आली. पीजी मालकाने पोलिसांना फोन करून बोलावले. पोलिसांनी रूमचा दरवाजा उघडताच काही तरी बरेवाईट झाल्याचा संशय त्यांना आला. बेडचा बॉक्स उडताच त्यात तरुणीचा मृतदेह हातपाय बांधलेल्या अवस्थेत आढळून आला. पोलिसांनी लगेच सूत्रे हलविली आणि तिच्या बॉयफ्रेंडला अटक केली, सोबतच त्याच्या मित्रांनाही अटक करण्यात आली आहे. आता हत्या नेमकी कोणत्या कारणामुळे केली याचा तपास पोलिस करीत आहेत.

तोंडात बोळा आणि हात-पाय बांधले

पोलिसांनी रूम तपासली त्यावेळी मृत तरुणीचे हात-पाय बांधलेले होते आणि तिच्या तोंडात बोळा खोचलेला होता. यावरून त्याने तरुणीचे हातपाय बांधले, तिच्या तोंडात बोळा खोचला आणि तिचा गळा आवळून खून केला. त्यानंतर मृतदेह बेडच्या बॉक्समध्ये लपवला व पसार झाला. ते दोघेही गेल्या ७ वर्षांपासून रिलेशनशिपमध्ये होते आणि त्याची कल्पना त्यांच्या मित्र वर्तुळात सर्वांनाच होती. त्यामुळे हत्येमागील नेमके कारण शोधणे पोलिसांपुढे आव्हान आहे.

लाच घेतल्याप्रकरणी परभणीत २ अटकेत

परभणी, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. लाचलुचपत प्रतिबंधक ब्युरोने (एसीबी) परभणी जिल्ह्यातील २ वेगवेगळ्या लाचखोरीच्या प्रकरणांमध्ये कारवाई करत वैद्यकीय अधीक्षक आणि भूमी अभिलेख अधिकाऱ्याला रंगेहाथ अटक केली आहे. पहिली घटना पालम ग्रामीण रुग्णालयात घडली, जिथे वैद्यकीय अधीक्षक डॉ. रमेश खांडारेला ४०,००० रुपयांची लाच घेताना रंगेहाथ पकडले गेले. तक्रारदाराने सांगितले की, त्यांच्या भावाच्या 'परिवर्तन लेबर कॉन्ट्रॅक्टर अँड मल्टीसर्व्हिसेस' या कंपनीने रुग्णालयातील स्वच्छता सेवेसाठी निविदा सादर केली होती. डॉ. खांडारे यांनी निविदा मंजूर करण्यासाठी ५०,००० रुपयांची मागणी केली होती. एसीबीच्या तपासानंतर, हा व्यवहार ४०,००० रुपयांवर निश्चित झाला आणि त्यांनी लाच स्वीकारताच पथकाने त्यांना अटक केली. त्याच्याकडून रोकड आणि मोबाईल फोन जप्त करण्यात आले, तर त्याच्या वाहनातून अतिरिक्त १५,००० रुपये जप्त करण्यात आले. पालम पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा, १९८८ अंतर्गत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. दुसरी कारवाई पाथरी तालुक्यात करण्यात आली, जिथे भूमी अभिलेख विभागाचे कर्मचारी रामेश्वर गुरुलिंगप्पा बिडकर यांना ८,००० रुपयांची लाच घेतल्याप्रकरणी अटक करण्यात आली.

वाहनाच्या धडकेत बिबट्याचा मृत्यू

तिवसा. भरधाव वाहनाच्या धडकेत बिबट गंभीर जखमी झाल्याची घटना गुरुवारी सकाळी ९ वाजताच्या सुमारास उघडकीस आली. या मादी बिबटचा तासभरानंतर मृत्यू झाला. ही घटना अमरावती-नागपूर महामार्गावरील तिवसा शहर परिसरात असणाऱ्या वैभव वानखडे यांच्या शेताजवळ घडली.राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६ वर वाहनाच्या धडकेत एक बिबट्या गंभीर जखमी अवस्थेत पडून होता. महामार्गावरून जाणाऱ्या काही नागरिकांना जखमी अवस्थेत बिबट्या दिसल्याने त्यांनी तत्काळ मोर्शी वनविभागाला माहिती दिली. माहिती मिळताच मोर्शी वनविभागाचे अधिकारी व अमरावती वनविभागातील रेस्क्यू पथक घटनास्थळी दाखल झाले.

पत्नीसाठी पदाचा दुरुपयोग, नेपाळमध्ये मंत्र्याची हकालपट्टी

काठमांडू, वृत्तसंस्था. पत्नीची विमा मंडळावर फेरनियुक्तीसाठी पदाचा दुरुपयोग केल्याचे स्पष्ट झाल्याने नेपाळचे नेपाळचे पंतप्रधान बालेंद्र शाह यांनी गुरुवारी त्यांच्या एका मंत्र्याला पदावरून हटवले. शाह यांनी पदभार स्वीकारल्यानंतर १५ दिवसांनी ही कारवाई करण्यात आली, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. पंतप्रधान कार्यालयाने दिलेल्या माहितीनुसार, सत्ताधारी राष्ट्रीय स्वतंत्र पक्षाच्या (आरएसपी) शिफारशीनुसार कामगार, रोजगार आणि सामाजिक सुरक्षा मंत्री दीप कुमार साह यांना त्यांच्या पदावरून हटवण्यात आले आहे. आरएसपीचे अध्यक्ष रवी लामिछाने यांनी साह यांच्या विरोधात कारवाईची शिफारस केली होती. आपल्या पत्नीचा कार्यकाळ संपलेला असतानाही, आरोग्य विमा मंडळावर त्यांची पुन्हा नियुक्ती करून घेण्यात साह यांनी महत्त्वाची भूमिका बजावली, जो पदाचा दुरुपयोग मानला गेला. पंतप्रधानांच्या प्रसिद्धी सल्लागार दीपा दहल यांनी सांगितले की, आरएसपीच्या केंद्रीय शिस्तपालन समितीने बुधवारी दीप कुमार साह यांना पदावरून हटवण्याची शिफारस पंतप्रधानांना सादर केली होती. साह यांच्या बडतर्फीनंतर पंतप्रधानांनी कामगार मंत्रालयाचा अतिरिक्त कार्यभार स्वीकारला आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकारण विभाग, नागपूर

ई-निविदा सूचना क्रमांक 06 सन 2026-2027 (प्रथम मागणी)

प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना **(PMKKKY)**जिल्हा खनिज प्रतिष्ठाण, नागपूर अंतर्गत मांढळ पाणी पुरवठा योजना (पूर्ण ठेव तत्वावर) ता. कुही, जि. नागपूर - वैयक्तीक घरगुती नळ जोडणी व पाण्याचे मिटर पुरविणे व लावणे या कामाची ई-निविदा मजीप्रा कडून मागविण्यात येत आहे. कामाची अंदाजित किंमत रु 1,52,41,559/- आहे. सदर निविदेचा सविसतर तपशील दि. 10/04/2026 पासून **www.mahatenders.gov.in** या वेबपोर्टलवर उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. निविदा प्रक्रिया कार्यक्रमाचा सर्व तारखा **www.mahatenders.gov.in** या वेबपोर्टलवर अपलोड करण्यात आलेल्या ऑनलाईन निविदा सुचनेनुसार राहतील.

कार्यकारी अभियंता
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग,
नागपूर

DGIPR/2026-27 / C 135

पश्चिम रेल्वे – वडोदरा विभाग

विविध अभियांत्रिकी कार्ये

ई-निविदा सूचना क्र. डीआरएम-बीआरसी ००१ ते ००३ / २०२६-२७

भारताच्या राष्ट्रपतींसाठी आणि त्यांच्या वतीने विभागिय रेल्वे व्यवस्थापक (डब्ल्यूए/सी), पश्चिम रेल्वे, प्रतापनगर, वडोदरा – ३९०००४ द्वारे खालील कामांसाठी मोहरबंद निविदा मागविण्यात येत आहेत.

अनु. क्र.	निविदा क्र.	कामाचे नाव	कामाचे अंदाजे मूल्य (रु. मध्ये)	जमा करायची बोली सुरक्षा (रु.)
०१	डीआरएम-बीआरसी ००१/२०२६ -२७	प्रतापनगर : बदल करण्यासाठी टाईप-II चे १६ युनिट्स आणि टाईप-V कवाटर्सच्या ४ युनिट्सचे बांधकाम.	७,७४,६२,४४६.८६	१५,४९,३००.००
०२	डीआरएम-बीआरसी ००२ /२०२६-२७	वडोदरा विभाग : वडोदरा विभागामधी टिंबा, अम्ब्रावी,अलीराजपू,डाको, वडतल आणि चांदोड स्थानकामध्ये रबल/स्टोन बोल्डर्स क्वॅरी डस्टचा पुरवठा (पुनर्बांधणी) (आर-१).	५९,०१,७१४.७५	१,१८,०००.००
०३	डीआरएम-बीआरसी ००३ /२०२६-२७	वडोदरा विभाग: डीईएन (पूर्व) बीआरसीच्या अधिकारक्षेत्राअंतर्गत आरसीसी बॉक्स तरतुदीद्वारे सध्याचे आर्च आणि पाईप ब्रिजेस बदलणे आणि अतिरिक्त वॉटर वेची तरतूद.	११,७२,८०,९१३.८९	२३,४५,६००.००

वरील सर्व निविदांसाठी : निविदा सादरीकरण आणि निविदा उघडण्याचा दिनांक आणि वेळ : निविदा दि. २७.०४.२०२६ रोजी १५.०० वा. पूर्वी जमा कराव्यात आणि त्याच दिवशी १५.३० वा. उघडण्यात येतील. **संकेतस्थळ वर्णन आणि सूचना फलकाचे ठिकाण जेथे निविदेचे पूर्ण वर्णन पाहता येईल :** संकेतस्थळ @ www.ireps.gov.in विभागिय रेल्वे व्यवस्थापक (डब्ल्यू/ सी) पश्चिम रेल्वे, प्रतापनगर, वडोदरा – ३९०००४. **बीआरसी-४२०**

आम्हाला लाईक करा : facebook.com/WesternRly. आम्हाला फॉलो करा : x.com/WesternRly

ऑनलाइन मागवले लाखोंचे सामान, बॉक्समध्ये आले डिटर्जंटचे पाकिट!

दिल्ली, वृत्तसंस्था. सर्वांत सुरक्षित मानल्या जाणाऱ्या ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मवरूनही फसवणूक होऊ शकते. स्वागत नायक नावाच्या एका व्यक्तीने ॲमेझॉनवरून सुमारे ३ लाख रुपये किमतीचे महागडे ग्राफिक कार्ड मागवले परंतु त्याला प्रत्यक्षात मिळाले एक डिटर्जंटचे पाकिट. फसवणूक झाल्याचे कळताच त्याने कंपनीशी संपर्क साधला परंतु त्याला प्रतिसाद मिळाला नाही. त्याने नंतर पोलिसांत फसणुकीची तक्रार दाखल केली आहे. आता त्याचा रिफंडसाठीचा लढा सुरू आहे. मात्र, या प्रकरणातून अनेक धक्कादायक बाबी उघड होत असून हे एक मोठे रॅकेट असल्याचे त्याच्या लक्षात आले आहे. ही फसवणुकीची बातमी ऑनलाईनवर चांगलीच व्हायरल झाली आहे. ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मवरील या फसवणुकीचा शोध घेत असताना त्याने संबंधित प्लॅटफॉर्मच्या लॉजिस्टिक्स हबमध्ये एक मोठा, संघटित अंतर्गत फसवणुकीचा घोटाळा उघडकीस आणल्याचा दावा केला आहे. आपल्या दाव्यांना बळ देण्यासाठी, त्याने फसव्या करचुकवेगिरी, शेल कंपन्यांचा सहभाग आणि गोदामे व प्रशासकीय कार्यालयांची संशयास्पद ठिकाणे यांचा उल्लेख केला आहे.

परतावा लांबला: नायकने गेल्या महिन्यात ॲमेझॉनवरून २.९ लाख किमतीचे गिगाबाईट आरटीएक्स ५०९० हे ग्राफिककार्ड ऑर्डर केले होते. त्याला ॲमेझॉनच्या 'फुलफिल्ड बाय ॲमेझॉन' गॅरंटीचा आधार होता. परंतु त्याला प्रीमियम जीपीयूऐवजी घडी डिटर्जंटचे एक पाकीट मिळाले. कंपनीने सुरुवातीला परतावा देण्यास नकार दिला होता.

एकाच ठिकाणी वेगवेगळी जीएसटी-नोंदणीकृत दुकाने?

स्वागत नायकने बनावट इनव्हॉइसमधील जीएसटीआयएन तपशील तपासले, जे दोन वेगवेगळ्या नोंदणीकृत दुकानांशी जोडलेले होते. एक दुकान पुरुषांच्या कपड्यांचा व्यवसाय करत होते, तर दुसरे सिमेंट आणि टाईल्सचा व्यवसाय करत होते. आश्चर्यकारक गोष्ट ही आहे की, या जीएसटी अंतर्गत नोंदणीकृत प्रशासकीय कार्यालय ओखला येथील ॲमेझॉनच्या गोदामाच्या जवळपास त्याच पत्त्यावर आहे. ते गिगाबाईट इंडिया आणि डब्ल्यूपीजी कंप्यूटर्स अँड (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेडच्या कार्यालयांच्याही अगदी जवळ आहे, ज्यांनी प्रत्यक्षात भारतात जीपीयू आयात केला होता. आता या लढाईतून मागे न हटण्याचा निर्धार त्याने केला आहे.

बैंक ऑफ़ बड़ौदा Bank of Baroda

शाखा - नंदनवन, नागपूर

कोठीराम चेंबर्स, गुरुदेव नगर, बापू नगर, नंदनवन, नागपूर - 440024

वाहन ई-लिलाव सूचना

याद्वारा सर्वसाधारणपणे जनतेला आणि विशेषत: कर्जदारांना आणि जमानतदारांना सूचना देण्यात येत आहे की बँकेने पक्षांनी केलेल्या गहाणखत/कर्ज करारांतर्गत दिलेल्या अधिकारांचा वापर करुन खाली नमूद केलेले गहाण असलेले मोटार वाहन परत ताब्यात घेतले/जप्त केले आहे आणि खाली नमूद केलेल्या खात्यांमधील थकबाकी वसूल करण्यासाठी वाहन **"जसे आहे तिथे आहे", "जसे आहे जे आहे"** आणि **"जे काही आहे ते"** या आधारावर विकले जाईल. कर्जदार/जमानतदार/वाहन/एकूण देय/राखीव किंमत/ई-लिलाव तारीख आणि वेळ, ईएमडी आणि बोली वाढीची रक्कम यांचे तपशील खाली खालीप्रमाणे-

अनु. क्र	कर्जदार/जमानतदार/ यांचे नाव आणि पत्ता	एकुण देय	वाहन निर्माता आणि मॉडेल आरटीओ नोंदणी क्रमांक	1. ई-लिलावाची तारीख आणि वेळ 2. बोली सादर करण्याची शेवटची तारीख आणि वेळ	1. राखीव किंमत 2. अर्नेस्ट मनी डिपॉझिट (ईएमडी) 3. बिड वाढीव रक्कम	ईएमडी ठेव खाते क्रमांक आयएफएससी कोड शाखा	वाहन / चल मालमत्ता तपासणी तारीख आणि वेळ
1	श्री बाबूलाल रामेश्वरलाल योगी (कर्जदार) श्री लोकेश कुमार बाबुलाल योगी (जमानतदार)	रु. 25,95,323/- लागु न झालेले व्याज + खर्च	संपत्तीची आयडी : BARBMH40CM0006 व्यावसायिक वाहन नोंदणी क्रमांक : MH40 CM0006 नोंदणीची तारीख : 08-08-2023 चेसिस क्रमांक : MB1CW CHD2PR JJ9624 इंजिन क्रमांक : PJHZ414 551 मेक/मॉडेल : अशोक लेलँड लिमिटेड GB2820/ 66 HCO वापरलेले इ